पत्र

जाक्र./कृषिआ/फलो-२/नारळ पिक विमा/२२०९/२०१५
कृषि आयुक्तालय (फलोत्पादन) महाराष्ट्र राज्य,
पुणे-४११ ००५ दिनांक- २८ जुलै, २०१५

प्रति,

**विभागीय कृषि सहसंचालक,**
**ठाणे**

**विषयः- नारळ पीक विमा योजनेची अंमलबजावणी करणेबाबत...**
**सन २०१५-१६ मार्गदर्शक सूचना...**

**संदर्भ :-** नारळ विकास मंडळ,कोची यांचे पत्र क्र.एफ नं.१५३९/२०१५-stat दिनांकः-६/७/१४

उपरोक्त सर्दर्भिय विषयाच्या अनुषंगाने नारळ विकास मंडळ, कोची यांच्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्यात नारळाचे प्रमुख उत्पादन घेणा-या ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हयांत सन २०१५-१६ या वर्षासाठी नारळ पीक विमा योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी मंजुरी देण्यात आलेली आहे. चालू वर्षात राज्यात एकुण ९५२.३८ हेक्टर क्षेत्रावर नारळ पीक विमा कार्यक्रम राबविण्याचा असून त्यासाठी २०.०० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे.त्यानूसार सदरहू तरतुदीपैकी ५० टक्के म्हणजेच रक्कम रु.१०.०० लाख (५० टक्के) हिस्सा नारळ विकास मंडळ, कोची , राज्य शासन हिस्सा रक्कम रु.५.०० लाख (२५ टक्के) इतका व शेतक-यांचा हिस्सा रक्कम रु.५.०० लाख (२५ टक्के) असा रु.२०.०० लाखाचा कार्यक्रम निश्चित करण्यात आलेला आहे. क्षेत्रिय स्तरावर योजनेची अंमलबजावणी करणेकरीता मार्गदर्शक सूचना सोबत सहपत्रित करण्यात येत आहे.

**जिल्हानिहाय नारळ पीक विमा योजनेची निश्चित करण्यात आलेली भौतिक उद्दिष्टे खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | जिल्हा | लक्षांक (हेक्टर) | अंदाजित झाडांची एकूण संख्या |
|---|---|---|---|
| १ | ठाणे | ६८ | ६८०० |
| २ | पालघर | १२० | १२००० |
| ३ | रायगड | १८८ | १८८०० |
| ४ | रत्नागिरी | २६८.१९ | २६८१९ |
| ५ | सिंधुदुर्ग | ३०८.१९ | ३०८१९ |
| | **एकूण** | **९५२.३८** | **९५२३८** |

वरीलप्रमाणे देण्यात आलेल्या जिल्हानिहाय लक्ष्यांकानूसार नारळ पीक विमा योजनेसाठी फक्त लाभार्थी निवडीची प्रक्रिया पुर्ण करावी. व योजनेसाठी राज्य शासनाकडून प्रशासकीय व वित्तिय मान्यता प्राप्त झाल्यानंतरच योजनेची अंमलबजावणी सुरु करावी. त्यादुष्टीने वित्तिय व प्रशासकीय मान्यता प्राप्त होताच विमाच्या आवेदन पत्राचा

नमुना, प्रपत्रे व **माहितीपत्रके, भारतीय कृषि** विमा कंपनीकडून प्राप्त करुन क्षेत्रिय यंत्रणेस उपलब्ध करुन दयावीत. नारळ उत्पादकांचे सदरच्या विहित नमुन्यातील (तीन प्रतीतील) प्रस्ताव पत्रक, पूरक कागदपत्रे व विमा हप्त्याचा धनादेश क्षेत्रिय स्तरावर घेऊन जिल्हा व विभागामार्फत भारतीय कृषि विमा कंपनी मर्यादीत,मुंबई यांचेकडे पाठविण्याची कार्यवाही पुर्ण करावी. त्याबाबतचा जिल्हानिहाय प्रगतीबाबत विहित प्रपत्रातील अहवाल या कार्यालयास प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेपर्यत पाठवावा.

**सोबतः-** वरीलप्रमाणे

**मा. संचालक, फलोत्पादन यांना**
**स्थळ प्रत मान्य असे.**

**संचालक फलोत्पादन**
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे - ४११ ००५ १५

**प्रत :-जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, ठाणे/पालघर/ रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग** यांना माहिती तथा तात्काळ कार्यवाहीस्तव.

**प्रतिलिपि :- १) उपसंचालक,** नारळ विकास मंडळ, विभागीय कार्यालय, रोड नं.१६, झेन लेन, ठाणे (प) ४०० ६०४ यांना माहितीस्तव.

२) **कक्ष अधिकारी, १३ अे,** कृषि व पदुम विभाग,मंत्रालय विस्तार भवन, मंत्रालय, मंबई-३२

३) **प्रादेशिक व्यवस्थापक,** भारतीय कृषि विमा कंपनी,स्टॉक एक्सचेंज टॉवर्स, २० वा मजला,पूर्व खंड, दलाल स्ट्रीट फोर्ट, मुंबई- ४०० ०२३

## राष्ट्रीय पीक विमा कार्यक्रम ( नारळ पीक विमा योजना )
## २०१५-१६ मार्गदर्शक सुचना

### १) प्रस्तावना –

नारळाच्या पिकास वातावरणातील बदल, नैसर्गिक आपत्ती, कीटक रोग व तत्सम बाबीपासून धोका असतो, किंबहुना एखाद्या क्षेत्रातील झालेल्या किडीच्या प्रादुर्भावामुळे संपूर्ण नारळ पिकास नुकसान होते.नारळ हे बहुवार्षीक पिक असल्याने शेतकऱ्यांना मोठया नुकसानीस सामोरे जावे लागते अशा परिस्थितीत होणाऱ्या नुकसानीस सरंक्षण मिळणे गरजेचे आहे. यासाठी पथदर्शी नारळ विमा योजना राबविण्यात येत आहे. केंद्र शासनाने पथदर्शी नारळ विमा योजना ही राष्ट्रीय कृषि विमा कार्यक्रमामध्ये समाविष्ट करुन रब्बी हंगाम सन २०१३-१४ पासून राबविण्यास मान्यता देवून त्यामध्ये काही बदल सुचविले आहेत. त्यानुसार नारळ पिकासाठी राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पीक विमा कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचना खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

नारळ हे बहुवार्षिक कोरडवाहू पिक असून ते जैविक व अजैविक घटकांना बळी पडते त्यामुळे नारळ पीक विमा योजनेव्दारे लघु व सिमांत शेतकऱ्यांना होणाऱ्या नुकसानीस नारळ विमा योजनेद्वारे संरक्षण दिले जाईल.

### २) नारळ विमा योजनेचे उद्देश :-

१. नारळ उत्पादकांना नैसर्गिक आपत्ती व इतर कारणांमुळे नारळाच्या झाडांना होणाऱ्या नुकसानीस विमा सरंक्षण देणे.

२. नारळ उत्पादकांना अकाली होणाऱ्या नारळाच्या (उत्पादकता नष्ट होणे) नुकसानीस वेळेत आर्थिक सहाय्य देणे.

३. नारळ उत्पादनातील धोके कमी करुन उत्पादकांना पुर्नलागवड व नारळ बागेचे पुनरज्जीवन करण्यास प्रोत्साहन देवून नारळ शेती अधिक फायदेशीर बनविणे.

**३) उपयुक्तता :-** पथदर्शी नारळ विमा योजनेअंतर्गत निरोगी, फळे येणाऱ्या, एकल किंवा मिश्र लागवड केलेल्या बांधावरील किंवा परसबागेतील सर्व जातीच्या बुटक्या तसेच उंच नारळाच्या झाडांचा विमा करता येईल. बुटक्या आणि संकरीत जातीच्या नारळाच्या झाडांना चवथ्या वर्षापासून फळे येत असल्याने अशा नारळाच्या झाडांच्या विम्याकरीता ४ ते ६० वर्षे वयोगटातील झाडांचा विमा करता येईल. उंच जातीच्या नारळाच्या झाडांच्या विम्यासाठी ७ ते ६० वर्षे वयोगटातील झाडांचा समावेश करता येईल. या योजनमध्ये रोगट व अनुत्पादक झाडांचा विमा करता येणार नाही.

**४) समाविष्ठ शेतकरी :-** ज्यांच्याकडे एकाच ठिकाणी (एका सर्वे नंबर / शेतामध्ये ) नारळाची उत्पादनक्षम / फळे येणारी कमीत कमी ५ झाडे (वयोगट बुटक्या जाती-४ ते ६० वर्षे, उंच व संकरीत जाती-७ ते ६० वर्षे ) असतील असे सर्व शेतकरी या योजनेतंर्गत सहभागी होण्यास पात्र असतील.

**५) विम्याची व्याप्ती : -** ही योजना नारळ पीक विमा योजनेमध्ये निवडलेल्या जिल्हयांतील सर्व शेतकऱ्याकरीता लागू असेल. योजनेमध्ये बुटक्या आणि संकरीत जातीच्या नारळाच्या ४ ते ६० वर्षे वयोगटातील झाडांचे व उंच जातीच्या नारळाच्या ७ ते ६० वर्षे वयोगटातील झाडांचे विमा हप्ता व विमा सरंक्षित रक्कमेसाठी दोन गटांमध्ये विभाजन केले आहे.

नारळाच्या झाडाच्या व यासंबंधी नारळ उत्पादकांचे घोषणापत्र स्वीकारले जाईल. भारतीय कृषि विमा कंपनी मर्यादित मुंबई -विमीत झाडांच्या सत्यतेसंबंधी विना समाप्ती कालावधीपूर्वी किंवा नुकसान भरपाईपूर्वी पडताळणी करु शकते. विम्यासंबंधी चुकीची माहिती अथवा घोषणापत्र दिल्याचे आढळल्यास विमा रद्द ठरविला जाईल.

नारळ विमा योजनेमध्ये सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांनी आपल्या जवळच्या कृषि विभाग, महाराष्ट्र शासनाच्या कार्यालयाशी संपर्क करावा व प्रस्ताव पत्रक भरुन विमा हप्ता जमा करावा. विमा प्रस्ताव पत्रक विमा हप्त्यासह भरल्यानंतर त्वरीत पोच पावती दिली जाईल.

६) **विमा संरक्षण-** पथदर्शी नारळ विमा योजनेमध्ये नारळाचे झाड विमा संरंक्षित बाबीमुळे मरण पावल्यास किंवा अनुत्पादक झाल्यास नुकसान भरपाई मिळेल. नारळाचे झाड केवळ अनुत्पादक झाले असल्यास कृषि विभाग, फलोत्पादन विभाग किंवा नारळ विकास बोर्ड, यांचे नारळाचे झाड अनुत्पादक झाल्याच्या कारणाबाबतचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.नारळाचे झाड अनुत्पादक आहे असे तेव्हाच म्हणता येईल जेव्हा विमा सरंक्षित बाबीमुळे नुकसान झाले असेल व झाडाची पुर्नवाढ अशक्य असेल तसेच ते नारळ उत्पादकाने नारळ बागेतून नष्ट केले पाहिजे. जर नारळ उत्पादक ते अनुत्पादक झाड तसेच उभे ठेऊ इच्छित असेल तर विमा सरंक्षित रकमेपैकी ५० टक्के पर्यत नुकसानभरपाई कमी दिली जाईल. नारळाच्या झाडास झालेले नुकसान विमा सरंक्षित बाबीमुळे झाल्याचे प्रस्थापित / सिध्द केले पाहिजे.

७) **संरक्षित जोखीम :** पथदर्शी नारळ विमा योजनेमध्ये खालील नमूद केलेल्या बाबीमुळे नारळाचे झाड मरण पावल्यास अथवा अनुत्पादक झाल्यास सरंक्षण / नुकसान भरपाई मिळते.

१) वादळ, गारपीट, चक्रीवादळ, टायफुन, टोरनॉडो, अतिवृष्टी

२) पूर आणि जलप्रलय

३) मोठया प्रमाणावर रोग व किडीचा प्रादुभाव

४) नैसगिक आग, वणवा ,वीज पडणे

५) भूकंप, जमिन धसणे, त्सुनामी

६) दुष्काळामुळे होणारे नुकसान

८) **असंरक्षित जोखीम** :-पथदर्शी नारळ विमा योजनेमध्ये खाली नमूद केलेल्या बाबीमुळे नारळाचे झाडे मरण पावल्यास अथवा अनुत्पादक झाल्यास सरंक्षण /नुकसान भरपाई मिळत नाही.

१ चोरीमुळे झालेले नुकसान, युध्द, आक्रमण, नागरी युध्द, बंडखोरी, क्रान्ती, इन्शुरन्स, म्युटीनी, टाळाबंदी, जाणीवपूर्वक केलेले नुकसान,कॉन्सेपरन्सी सैन्य कारवाई, सिव्हील कमोशन, कॉनफिक्शन इत्यादी शासकीय यंत्रणेमुळे झालेले नुकसान.

२ आण्विक अभिक्रिया, आण्विक उत्सर्जन किंवा उत्सर्जनाची लागण.

३ विमान किंवा इतर कोसळणाऱ्या वस्तूंमुळे होणारे नुकसान

४ जाणीवपूर्वक केलेला निष्काळजीपणा

५ मानवीय नुकसान, पक्षी किंवा प्राण्यामुळे झालेले नुकसान

६ झाडांची अव्यवस्थीत ठेवण /निगा

७ झाडे रोगट व अनुत्पादक होणे

८ झाडे नैसर्गिकरित्या मरणे, झाडांची मुळे कापणे.

९ स्थावर मालमत्ता जसे जमीन, नारळाच्या झाडांना आधार दिलेल्या वस्तू, शेतीला पाणी देण्याची साधने शेतीची औजारे.

**विमा सरंक्षित रक्कम व विमा हप्ता (प्रति नारळ झाड)**

| नारळ झाडाचे वय वर्षे | विम्याची प्रती झाड संरक्षित रक्कम रुपये | विमा हप्ता प्रती झाड / प्रति वर्षे रक्कम रुपये |
|---|---|---|
| ४ ते १५ वर्षे | ९००.०० | ९.०० |
| १६ ते ६० वर्षे | १७५०.०० | १४.०० |

**१०) विमा हप्ता अनुदान** : विमा हप्त्यातील अधिकांश रक्कम (व्यावसायिक विमा हप्ता व शेतकऱ्यांनी देय विमा हप्ता यातील फरकाची रक्कम) नारळ विकास मंडळ (५० टक्के) महाराष्ट्र शासनाव्दारे (२५ टक्के) विमा हप्ता अनुदान म्हणून दिला जाईल. तर २५ टक्के रक्कम शेतकऱ्यांनी विमा हप्ता म्हणून भरावयाचा आहे. नारळ पिक उत्पादक संघ शेतक-यांचा विमा हप्ता भरु शकेल मात्र शेतक-यानी कमीतकमी १० टक्के हप्त्याची रक्कम भरणे आवश्यक आहे.

**११) विमा सरंक्षण कालावधी** : विमा सरंक्षण कालावधी जास्तीत जास्त ३ वर्ष राहील. २ वर्ष कालावधीच्या विमा पॉलीसी करीता विमा हप्त्याच्या ७.५० टक्के दराने व ३ वर्ष कालावधीच्या पॉलीसी करीता विमा हप्त्याच्या १२.५ टक्के या प्रमाणे शेतकऱ्यांना हप्त्याच्या रक्कमेत सुट देय राहील. विमा पॉलीसी प्रस्ताव पत्रक भरलेपासून १ महिन्यानंतर सुरु होईल.

**१२) प्रतिक्षा कालावधी** :-पहिल्या वर्षी विमा संरक्षण सुरु झाल्यापासून सुरुवातीचे ३० दिवसाचे आत झालेले नुकसान विम्यास पात्र नाही. अशा शेतकऱ्यांना पुढील वर्षासाठी वेळेत नुतनीकरण झाल्यास दुसऱ्या वर्षी प्रतिक्षा कालावधी लागू नसेल.

**१३) फ्रेंचाई** : जर विमा सरंक्षित बाबीमुळे झालेले नुकसान पुढील दर्शविलेल्या तक्त्यानुसार असेल तरच नुकसान भरपाईसाठी पर्यवेक्षण केले जाईल.

| अ.क्र. | लगतच्या क्षेत्रातील विमा संरक्षित झाडांची संख्या | फ्रेंचाईजी (झाडे) (किमान नुकसान झालेल्या झाडांची संख्या) |
|---|---|---|
| १ | १० ते ३० | १ |
| २ | ३१ ते १०० | २ |
| ३ | १०० पेक्षा जास्त | ३ |

**१४) अधिसूचीत क्षेत्र** :महाराष्ट्रातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, व सिंधुदुर्ग जिल्हयातील सर्व तालुके.

**१५) अंमलबजावणी :** -नारळ पीक विमा योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी नारळ उत्पादकांनी महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाच्या तालुका/ग्राम स्थित अधिकारी/कर्मचारी यांचेकडे उपलब्ध असलेले विहीत नमुन्यातील (तीन प्रतीतील) प्रस्ताव पत्रक भरुन विमा हप्त्याचा डी.डी./धनादेश (डी.डी. AGRICULTURE INSURANCE COMPANY OF INDIA LIMITED. AXIS BANK A/C 004010200162869 जो मुंबई येथे देय असावा) जमा करावा. संबंधीत अधिकारी / कर्मचारी सर्व प्रस्ताव पत्रक व डी.डी. /धनादेश एकत्रितपणे संबंधित जिल्हयांच्या जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडे त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेपूर्वी पाठवतील.जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी हे डी.डी./धनादेश प्रस्ताव पत्रकासह विभागीय कृषि सह संचालक ठाणे यांना पाठवतील. विभागीय कृषि सह संचालक ठाणे हे डी.डी. /धनादेश प्रस्ताव पत्रकासह भारतीय कृषि विमा कंपनी मर्यादित मुंबई यांना पाठवतील. भारतीय कृषि विमा कंपनी मर्यादित मुंबई प्रत्येक महिन्यातील प्राप्त प्रस्ताव कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य यांना पृष्ठांकित (endorsement) करतील. भारतीय कृषि विमा कंपनी मर्यादित मुंबई योजनेच्या सुरवातीस एक मास्टर पॉलिसी राज्य शासनास देईल व प्रत्येक महिन्यातील प्राप्त प्रस्ताव पत्रकाचे पृष्ठांकन विभागीय कृषि सहसंचालक ठाणे यांना पाठवतील.

**१६) नुकसान भरपाई ठरविण्याची प्रक्रिया** : - पथदर्शी नारळ पीक विमा योजनेअंतर्गत शेतकऱ्यांनी झालेल्या नुकसानीची सूचना १५ दिवसाचे आत संबंधीत तालुक्यातील महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाच्या तालुका कृषि अधिकारी/भारतीय कृषि विमा कंपनी मर्यादित मुंबई क्षेत्रिय कार्यालय मुंबई यांना देणे आवश्यक आहे. नुकसान भरपाई प्रमाणपत्र विहीत नमुन्यात संबंधीत तालुक्यातील महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाच्या तालुका कृषि अधिकारी यांचे सहीने पाठविणे आवश्यक आहे. त्यानंतर प्रत्यक्ष सर्वेक्षणानंतर सर्वसाधारण ३० दिवसाच्या आत पात्र नुकसान भरपाई रक्कम शेतकऱ्यांना देण्यात येईल. विम्याची पूर्ण रक्कम दिलेनंतर विमा संपुष्टात येईल.

विमा धारक शेतकऱ्याकडून विमा हप्त्यापोटी जमा झालेल्या एकूण रकमेवर ७.५० टक्के या दराने देय होणारी रक्कम कृषि विभागास भारतीय विमा कंपनी मुंबई यांचेकडून दिली जाईल

**१७) निरीक्षण यंत्रणा** :-नारळ पीक विमा योजनेच्या निरीक्षणाकरीता समिती स्थापन केली जाईल, ज्यामध्ये नारळ विकास बोर्डचे प्रतिनिधी भारतीय कृषि विमा कंपनी मर्यादित व राज्य शासनाच्या कृषि/फलोत्पादन विभागाचे प्रतिनिधी सदस्य असतील.ही समिती प्रत्येक तिमाही मध्ये बैठक करुन योजनेच्या प्रगतीचा आढावा घेईल व योजनेला अधिकाधिक प्रसिध्दी मिळण्यासाठी सूचना देईल.

**१८) योजनेची प्रसिध्दी** : -पथदर्शी नारळ पीक विमा योजनेसाठी प्रसिध्दीसाठी आकाशवाणी, दूरदर्शन तसेच माहितीपत्रके व भिंतीपत्रके इ. प्रसिध्दी माध्यमांचा उपयोग करुन सदरची योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचेल याबाबतची कार्यवाही संबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी करावी. तसेच योजना अंमलबजावणीसाठी आवश्यकतेनुसार फॉर्म छपाई करुन घेण्यात यावी. योजनेची माहितीपत्रके / भिंतीपत्रके संबंधीत ग्रामपंचायत, खरेदी विक्री संघ, नारळ संघटना तसेच कृषि कार्यालयात लावण्यात यावीत.